नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०३/२०२५ ( गुरूवार ) सकाळ

---

## हातभट्टी लावुन दारू गाळणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## जलालखेडा पोलीस, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन जलालखेडा :— दिनांक २६/०३/२०२५ रोजी जलालखेडा पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, उमठा येथील स्माशानभुमी समोरील पारधी बेडा येथे घरी एक महीला आरोपी हातभट्टी लावुन दारू गाळत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता उमठा येथील स्माशानभुमी समोरील पारधी बेडा येथे एक महीला आरोपी हातभट्टी लावुन दारू गाळतांना दिसली. आरोपीच्या ताब्यातुन १) प्लास्टीक डबकीमध्ये मोहाफुल गावठी हातभटट्ची ८० लिटर दारू किमती ८,०००/— रूपये, २) ४ प्लास्टीक ड्रम मध्ये ८०० लिटर मोहाफुल सडवा किमती ४०,०००/— रूपये, व इतर साहित्य २६०० /— रूपये असा एकुण **किंमती ५०,६००/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महीला आरोपीच्या विरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम ६५ ई, एफ, मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

.

पोलीस माहिती कक्ष